# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/12/2023 (गुरूवार) सकाळ

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

१) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत १४ किमी अंतरावर मौजा मेजर हॉटेल समोर बाजारचौक निमखेडा येथे दिनांक २०/१२/२०२३ चे १०.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे– भारत खुशाल धुर्वे वय ४२ वर्ष, रा. बाणोर ता. मौदा याचा मामेभाऊ निलेश वरखडे रा. बाणोर हा गटाचे पैसे भरत नाही, ज्याच्या मायने दूध पिला असेल तो मला हात लावून दाखवेल असे बोलून फिर्यादीला शिवीगाळ केली व फिर्यादीसोबत भांडण केले. भांडणामध्ये **आरोपी नामे– निलेश कुशन वरखडे, वय ४० वर्ष रा. बाणोर ता. मौदा जि. नागपुर** याने फिर्यादीस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने मेजर हॉटेलचे बाजूला असलेल्या मनोहर अनकर याचे सलूनचे दुकानातून कैची आणून फिर्यादीच्या पोटावर मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुशिलकुमार सोनवाने मो. नं. ८२०८५४४२६८ हे करीत आहे.

२) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर होळी चौक येथे दिनांक २१/१२/२०२३ चे ११.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सौ. सुषमा ईश्वर धांडोळे, वय ३३ वर्ष, रा. होळी चौक सावनेर यांचे सासरे नामे– मधुकर घुलबाजी धांडोळे, वय ६५ वर्ष हे आपल्या घराचे समोर अंगणात सोफ्यावर बसले असता यातील **आरोपी नामे– शंकर उर्फ बालकृष्ण वासुदेव नारेकर, वय २६ वर्षे, रा. होळी चौक सावनेर** याने तुमचे मुल घरासमोर ओरडतात माझी झोप होत नाही. याच कारणावरून आरोपीने फिर्यादीच्या सासऱ्याला लोखंडी रॉडने त्याचे डोक्यावर मारून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विक्की लोखंडे पोस्टे सावनेर मो. नं. ७७२१८१४३०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर